# मुंबई विद्यापीठ

**स्मरणपत्र क्र. २**
**अंतिम स्मरणपत्र**

नेमणूक कक्ष, परीक्षा विभाग
सांताक्रुझ (पू), विद्यानगरी,
मुंबई – ४०००९८.

क्र. परिक्षा/नेमणूक/३६८/२०१७.

मुंबई विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागाचे संचालक/विभाग प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/विद्यापीठ संचालित कला, वाणिज्य, विज्ञान, व्यवस्थापन, शिक्षणशास्त्र, औषधशास्त्र, वास्तुशास्त्र, अभियांत्रिक व विधी महाविद्यालयांचे प्राचार्य, विद्यापीठाच्या दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक आणि संचालक यांना या स्मरणपत्राद्वारे सुचित करण्यात येते की, या कार्यालयाचे परिपत्रक क्र. Exam./App./348/of2017दिनांक १७ नोव्हेंबर, २०१७ व स्मरणपत्र क्र. १ क्र. परिक्षा/नेमणूक/३५३/२०१७ दिनांक २८ नोव्हेंबर, २०१७ बाबत आपणास अवगत करण्यात येत आहे की, विद्यापीठाच्या असे निदर्शनास आले आहे की,काही महाविद्यालय आपल्या महाविद्यालयात कार्यरत असलेल्या सर्व प्राध्यापकांची माहिती भरत नसून त्यामध्ये तफावत येत आहे. या परिपत्रकाद्वारे आपणास सुचित करण्यात येते की, ज्या महाविद्यालयांनी अपूर्ण माहिती भरलेली आहे ती त्यांनी **Edit** पर्यायावर जावून पूर्ण भरावी व ज्यांनी अद्याप पर्यंत आपल्या महाविद्यालयाची माहिती भरलेली नाही त्यांनी ती त्वरीत भरावी. ज्या महाविद्यालयांनी आपल्या महाविद्यालयाची पूर्ण माहिती भरली आहे त्यांनी सदर परिपत्रक दुर्लक्षित करावे.

आपणास असेही कळविण्यात येते की, जर सदर माहिती भरत असताना आपणास काही अडचण आल्यास खालील दिलेल्या ईमेल वर अथवा दुरध्वनी वर संपर्क करावा.

प्रणालीसाठी लिंक : www.mu.ac.in →**APPOINTMENT UNIT EXAM (TEACHER' S INFO)**
ईमेल: **appsoft@exam.mu.ac.in**
दुरध्वनी: ०२२ २६५४३४१६

सदर माहिती भरण्याची अंतिम तारिख ८डिसेंबर, २०१७ हि होती व ती वाढवून दिनांक ३१ जानेवारी, २०१८ पर्यंत देण्यात येत आहे. सदरहु अंतिम तारखेदिवशी उपरोक्त प्रणालीची लिंक बंद करण्यात येणार आहे. आपल्या महाविद्यालयातून सदर माहिती न भरल्यास त्याबाबत विद्यापीठ प्रशासनाच्या तसेच शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात येइल तसेच अशा महाविद्यालयांची यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर वितरीत करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

मुंबई– ४०० ०९८
१७ जानेवारी, २०१८

प्र संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

प्रति,

मुंबई विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागाचे संचालक/विभाग प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/विद्यापीठ संचालित कला, वाणिज्य, विज्ञान, व्यवस्थापन, शिक्षणशास्त्र, औषधशास्त्र, वास्तुशास्त्र, अभियांत्रिक व विधी महाविद्यालयाचे प्राचार्य, विद्यापीठाच्या दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक आणि संचालक.